दि:20 फेब्रुवारी,2014

# अविवेकी सहानुभूति

**-अरुण जेटली**

विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

मागील काही दशकात अनेक देश मृत्यूदंडाला समाप्त करण्याच्या दिशेने पुढे सरसावले आहेत. भारतात अनेक पांढरपेशी लोक सुद्धा या मागणीत शामील झाले आहेत. मात्र मागील तीन दशकात फोफावलेल्या दहशतवादाने माझे विचार बदलून टाकले आहेत. काय कोणता देश ज्याने इतका दहशतवादाचा सामना केला आहे तो याला समाप्त करण्याच्या दिशेने पुढे जाऊ शकतो?भारतात दहशतवादाच्या घटनेत वृद्धि झाल्यामुळे भारत उन्मुलन विरोधी विचारधारेत शामील झाला नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयाने संतुलन कायम ठेवताना मृत्यूदंडाच्या शिक्षेला जन्मठेप मध्ये परावर्तीत करुन यास “रेअरेस्ट ऑफ रेअर” प्रकरण सांगितले.

तथापि मृत्यूदंड नेहमी एक अत्यंत कठोर शिक्षा आहे जो रेअरेस्ट ऑफ रेअर प्रकरणात दिले जाते. सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच सांगितले की, फाशी देण्यासाठी अनावश्यक आणि रहस्यमय विलंबाचे कारण मृत्यूदंडाची शिक्षा बदलली जाऊ शकते. गृह मंत्रालय यांच्या द्वारे दयायाचिका निकाली काढणे, या मुद्द्यांवर राज्य सरकार यांच्याद्वारे आपले विचार सांगणे आणि इतपत की राष्ट्रपती भवनामुळे उशीर झाला. विलंबामुळे नुकतेच मृत्यूदंडाची शिक्षा भोगणा-या अनेक लोकांच्या शिक्षेत बदल झाले. कोणत्या ना कोणत्या तरी व्यक्तीची याबद्दल जबाबदारी असली पाहिजे की हा विलंब कोणामुळे आणि कशामुळे झाला. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या मारेक-यांना नुकताच दिलेला दिलासा हा अविवेकी होता. देशाचे माजी पंतप्रधान यांची हत्या झाल्यानंतर अशा लोकांसाठी संस्थेगत दयेला समजणे खुप कठिण आहे. जे लोक अशाप्रकारचे निर्घृण अपराध करतात त्यांना ओळखीचे राजकारणाचे प्रतीक नाही बनवले जाऊ शकत. राष्ट्रीय सुरक्षेसाठी यापेक्षा मोठा धोका कोणताही नाही. दहशतवाद देशाच्या विरोधात एक अपराध आहे. हे थांबविण्यासाठी मोठ्यात मोठी कडक शिक्षा असली पाहिजे.